दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

**प्रतिनिधी नेमणे आहे**
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com


● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.७ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 7 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 252 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नाही

## लाडकी बहीण योजनेचा फटका; छगन भुजबळांनी स्पष्टच सांगितले

मुंबई (वृत्तसंस्था)–लाडकी बहीण योजनेचा आनंदाचा शिधा योजनेला फटका. यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नसल्याची माहिती राज्याचे अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. लाडकी बहीण योजनेसाठी ४५ हजार कोटी रुपये द्यावे लागणार असल्याने आनंदाचा शिधा देऊ शकत नाही, असे भुजबळ यांनी स्पष्टच सांगितले आहे.आनंदाचा शिधा या योजनेतून राज्यातील गरिबांना सणासुदीच्या काळात केवळ १०० रुपायांमध्ये चार वस्तू योजनेच्या माध्यमातून मिळत होत्या. परंतु, आता लाडकी बहीण योजनेमुळे गोरगरिबांना सणासुदीच्या काळात आनंदाचा शिधा मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील तिजोरीतील एकदम ४५ हजार कोटी रुपये लाडकी बहीण योजनेसाठी द्यावे लागणार आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम इतर योजनांवर थोडा थोडा होत असल्याची कबुली छगन भुजबळ यांनी दिली आहे. आम्ही आता राज्य सरकारचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सध्या योजनांचा निधी बाबत मागेपुढे होत असले तरी आम्ही निधी उपलब्ध होईल तशी योजना चालवत राहू, असे भुजबळ म्हणाले.






पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, आनंदाचा शिधा द्यायचा असेल तर त्यासाठी दोन ते तीन महिने आधी टेंडर काढावे लागते. आता तरी हे शक्यत नाही. आनंदाचा शिधा आत्ता मिळणार नाही. त्यासाठी टेंडर काढावे लागते, त्यासाठी दोन तीन महिन्यांचा कालावधी लागतो. वर्षाला शिवभोजन थाळी साठी १४० कोटी रुपये तर आनंदचा शिधा साठी ५५० कोटी रुपये लागत होते.आनंदाचा शिधा या योजनेतून सणासुदींच्या निमित्ताने राज्यातील रेशनकार्ड धारकांना फक्त १०० रुपयात काही जीवनावश्यक वस्तू देण्यात येत होत्या. त्यामध्ये एक किलो साखर, एक किलो रवा, एक किलो चना डाळ, एक लीटर पामतेल देण्यात येत होते. आता हा शिधा यंदा देण्यात येणार नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ही योजना सुरू करण्यात आली होती. २०२२ साली दिवाळीला पहिल्यांदा आनंदाचा शिधा देण्यात आला होता.

# अंबाजोगाईत आढळलं कुजलेल्या अवस्थेतील प्रेत पोलिसांसमोर मोठं आव्हान

### या घटनेत नेते लक्ष घालणार का राजकारण फक्त निवडक हत्या प्रकरणांपुरतंच?

**बीड । लोकपत्रकार भांगे**

बीड च्या अंबेजोगाई शहरात एक धक्कादायक घटना समोर आली असून, स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या जवळ एका ऑटो रिक्षामध्ये सापडलेल्या कुजलेल्या अवस्थेतील मृतदेहामुळे शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे.आज दुपारी रुग्णालय परिसरात उभ्या असलेल्या एका ऑटो रिक्षामध्ये नागरिकांनी दुर्गंधी जाणवताच रिक्षामध्ये डोकावून पाहिले असता, एका तरुणाचा पूर्णपणे कुजलेला मृतदेह आढळून आला.घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी हलवण्यात आला आहे.मात्र, आता सर्वात मोठा प्रश्न उभा ठाकतो तो म्हणजे – हा मृतदेह ऑटो रिक्षात कसा आणि कोण आणून टाकलं?हा तरुण आधीच



मयत होता का? त्याचा खून करण्यात आला आहे का?ऑटो रिक्षा रुग्णालयात नेण्यासाठी वापरली गेली होती का? की पुरावे नष्ट करण्याचा हा प्रयत्न होता?या सर्व शक्यतांचा तपास अंबाजोगाई पोलिस करत आहेत. स्थानिक गुन्हे शाखा, फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली असून उउढत फुटेज तसेच रिक्षाचालकाचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या घटनेने शहरात भीतीचं आणि आश्चर्याचं वातावरण पसरलं आहे.नागरिकांमध्ये चर्चा सुरू असून, मृत तरुणाचे नाव, वय, आणि मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. ही केवळ एक अपघाती घटना आहे की एका मोठ्या गुन्ह्याचा भाग? आता बीड जिल्ह्यात एखाद्याच्या हत्या प्रकरणावर राजकारण करणाऱ्या लोकप्रतिनिधी असो किंवा सामाजिक कार्यकर्त्या म्हणून घेणाऱ्या. नेत्यांनी या घटनेकडेही तसंच लक्ष देऊन या घटनेला मध्ये देखील असंच बोलायला पाहिजे. संपूर्ण बीड जिल्हा पाहतोय संपूर्ण लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते या घटनेकडे असंच पाहणार की फक्त कोणालाच तरी राजकीय. डाव संपावा म्हणून एखाद्या व्यक्तीला टार्गेट करावा म्हणून एखाद्याच्या, हत्या प्रकरणाडून राजकारण करावं. हा प्रश्न आता जिल्हा वाशीय स्वतःला सामाजिक कार्यकर्ते. व राजकारण करणाऱ्या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना व सामाजिक कार्यकर्त्यांना विचारत आहे. अंबाजोगाईत जी घटना झाली याचं उत्तर आगामी तपासातूनच स्पष्ट होणार आहे.अंबाजोगाईतील ही घटना अजून किती रहस्य उघड करणार याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे.

# डोंगरातून आला मृत्यू, घर-दुकान, माणूस क्षणात सगळे गायब



**उत्तराखंड । प्रतिनिधी**

उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यात हादरवून सोडणारी घटना घडली आहे. हर्षिलमध्ये अचानक ढगफुटी झाली. त्यामुळे खीर गाडचा जलस्तर वाढला. मोठ्या प्रमाणात ढिगारा धराली गावाकडे वाहत आला. त्याच्या कोसळण्याच्या मार्गात अनेक घरं आली. बघता, बघता क्षणात सगळं उद्धवस्त झालं. या दुर्घटनेत ६० जण बेपत्ता झाल्याची शक्यता आहे. ढिगारा आणि पुराचं पाणी अनेक घरं आणि हॉटेलमध्ये घुसलं. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालय. धराली मार्केट क्षेत्रात पाणी आणि ढिगाऱ्यांमुळे अनेक दुकानांच नुकसान झालं. स्थानिक लोक आपल्या आप्तस्वकीयांच्या शोध लागत नसल्याने चिंतेत आहेत. या घटनेची सूचना प्रशासनाला मिळताच त्यांनी मदत आणि बचाव कार्य सुरु केलं. भटवाडीतून एसडीआरएफची टीम तात्काळ धरालीला रवाना झाली. त्याशिवाय स्थानिक पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. बचाव पथकाने फसलेल्या लोकांना सुरक्षित स्थळी पोहोचवण्याचा काम सुरु केलय. उत्तरकाशी पोलिसांनी सोशल मीडिया प्लेटफॉर्म द वर लोकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलय. खीर गाडचा जलस्तर वाढल्यामुळे धरालीमध्ये नुकसान झाल्याची सूचना आहे. डऊ्रक्र आणि आर्मी घटनास्थळी आहे. पोलिसांनी स्थानिक लोकांना आवाहन केलय की, त्यांनी नदी आणि नाल्याजवळ जाऊ नये.

# दादा दर आठवड्याला यायला हवेत म्हणजे बीड शहर तरी नीट राहील!

## पालकमंत्र्याचा दौरा आला की शहर सजतं;बाकी वेळेस प्रश्न कुजतात!



**बीड । लोकपत्रकार भांगे**

राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, जिल्हा प्रशासनाला नवचैतन्य आलंय का, असा प्रश्न सामान्य जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. दादा येणार म्हटल्यावर रस्ते धुतले गेले, विश्रामगृहाला नवा रंग चढला आणि नगर परिषदेने 'स्वच्छ बीड' साकारण्याचा प्रयत्न केला. दौरा म्हणजे केवळ राजकीय भेटींचं औपचारिक स्वरूप नसून, तो जणू संपूर्ण शहराच्या मेकओव्हरचा संकेत ठरतो आहे. विश्रामगृहाची भिंत असो की दगडांच्या खाचांमध्ये साचलेला कचरा – सर्व काही एका रात्रीत बदललं. दादांचा दौरा म्हणजे बीडकरांना अचानक स्वच्छतेचं दर्शन!एक नागरिक म्हणाला – दादा आठ दिवसात एकदा आले, तरी आम्हाला स्वच्छ शहर मिळतं. मग प्रशासन कायमस्वरूपी जागं का राहत नाही? नगर परिषदेचा खटाटोप – नगर परिषदेने दादांच्या स्वागतासाठी साफसफाईचे लष्कर उभं केलं. कर्मचाऱ्यांना धावपळ, ठिकठिकाणी झाडलोट, पाण्याने रस्ते धुणं आणि मुख्य चौकात पाट्या लावून 'स्वच्छ बीड'चा झोत दाखवण्याचा आटापिटा! सामान्य नागरिकांना स्वच्छता पाहण्यासाठी पालकमंत्र्यांच्या दौर्याची वाट पहावी लागते का?कायमस्वरूपी देखभालीचं काय?दादांच्या दौऱ्याने जर एवढा बदल शक्य असेल, तर त्याचं नियोजन आठवड्याला एकदा का होत नाही?बीड झळाळलं... पण कायमचं नाही. प्रशासनाला हलवायचं असेल, तर अजितदादा दर आठवड्याला यायला हवेत की काय?अजितदादा पवार हे केवळ मंत्री नाहीत तर बीडच्या प्रशासनाला 'ऍक्टिव्ह मोड'मध्ये आणणारे प्रेरणास्थान ठरत आहेत. मात्र ही प्रेरणा एका दिवसापुरती नको. बीडचा विकास आणि स्वच्छता ही फक्त 'दौऱ्याची शोभा' न राहता, सामान्य जनतेच्या हक्काची बाब व्हावी, हीच खरी लोकआशा!



बीड जिल्ह्याच्या मा.खा.तथा भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ.प्रीतमताई मुंडे दि.६ ऑगस्ट २०२५ रोजी वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ केज येथे आल्या असताना भाजपचे जेष्ठ नेते रामकृष्ण काका घुले यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.यावेळी युवा नेते सुरज भैय्या घुले व घुले कुटुंबाने मा.खा.मुंडे यांचे आदरातिथ्य केले.घुले यांच्या निवासस्थानी जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा काकाजी,भाजपचे महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अक्षय भैय्या मुंदडा तसेच पदाधिकारी,कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## धक्कादायक! दरा फाट्याजवळ भीषण अपघात

# भरधाव कारची उभ्या आयशरला धडक कारचा चक्काचूर, तरीही प्रवासी बचावले

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा तालुक्यातील दरा फाट्याजवळ सोमवार, ४ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास भीषण अपघात झाला. ब्राह्मणपुरीहून येणाऱ्या भरधाव होंडाई कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या आयशर वाहनाला जोरदार धडक दिली.अपघाताची तीव्रता इतकी होती की कारचा चक्काचूर झाला. मात्र, एअरबॅग वेळेवर उघडल्यामुळे कारमधील प्रवाशांचा जीव वाचला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. धडकेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आणि स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली.
घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला. कारचा चालक अद्याप बेपत्ता असून, उभ्या असलेल्या आयशर वाहनाबाबतही चौकशी सुरू आहे. रस्त्याच्या कडेला अशा पद्धतीने वाहन उभे ठेवणे हे गंभीर अपघाताचे कारण ठरू शकते, असे पोलिसांनी नमूद केले.या घटनेमुळे रस्त्यावर सुरक्षितपणे वाहन चालवण्याचे महत्त्व आणि वाहने नियमांनुसार उभी करण्याची आवश्यकता पुन्हा अधोरेखित झाली आहे.



## संपादकीय

# परिवर्तनाची नांदी



पुणे आणि गणेशोत्सवाचे अतूट नाते आहे. किंबहुना सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवातच पुण्यनगरीतून झाल्याने पुण्यातील या महोत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गणेशोत्सवाप्रमाणेच पुण्यातील विसर्जन मिरवणूकही तेवढीच वैभवशाली असते. यंदापासून अखिल मंडई आणि भाऊरंगारी गणपती मंडळाने विसर्जन मिरवणुकीत मानाच्या पाच गणपतीनंतर सहभागी व्हायचा निर्णय घेतला आहे. याने मिरवणूक लवकर संपण्यास मदत होईल आणि पोलीस प्रशासनावरचा ताण कमी होईल. मिरवणूक लवकर संपेल असे म्हटले जात असले तरी तसे होईल का, हा प्रश्न आहे. मिरवणूक लवकर संपविण्याचे आव्हानही पोलिसांपुढे असणार आहे.या वर्षी अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी ग्रहण आहे. त्यामुळे या मंडळांनी हा निर्णय घेतला. पण, दरवर्षीच आता ही मंडळे मिरवणुकीत लवकर सहभागी होणार आहेत. मानाच्या पाच गणपतीनंतर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, अखिल मंडई आणि भाऊरंगारी गणपती हे आकर्षणाचा केंद्रबिंदू असतात. या गणपतींचे रथ आणि रथावर असलेली विद्युत रोषणाई बघण्यासाठी गणेभक्त अलोट गर्दी करतात. या गणपतींचे विसर्जन झाल्यावर गणेशभक्तांची गर्दी ओसरायला लागते. पोलीस प्रशासनावरील ताणही कमी होतो. अनेक वर्षे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, अखिल मंडई आणि भाऊरंगारी गणपती ही मंडळे रात्री मिरवणुकीत सहभागी होतात

यामुळे विसर्जन मिरवणूक लांबत जाते. या मंडळांपुढे ढोल-ताशा, पथके, बँड पथके यामुळे मिरवणूक लांबत जाते, असा आरोपही या मंडळांवर सातत्याने होत असतो. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाल्याशिवाय मंडई आणि भाऊसाहेब रंगारी गणपतीला मिरवणुकीमध्ये सहभागी होत नाही. पण, गेल्या दोन वर्षांपासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीने मिरवणुकीत दुपारी ४ वाजता सहभागी होण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. दोन वर्षांपासून दगडूशेठ गणपती दुपारी ४ वाजता मिरवणुकीत सहभागी होत आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे विसर्जन झाल्यावर गणेशभक्तांची गर्दी ओसरायला लागते, असेच चित्र गेली दोन वर्षे दिसून आले आहे. मंडई आणि भाऊरंगारी गणपती रात्री उशिरा मिरवणुकीमध्ये सहभागी होत असल्याने गणेभक्त जागेवरच दर्शन घेऊन भक्तांची पावले घराकडे वळतात. यावर्षी असलेले ग्रहण आणि गणेशभक्तांकरिता मंडई आणि भाऊसाहेब रंगारी मंडळाने घेतलेला निर्णय योग्य ठरतो की नाही हे पाहणे औत्स्युक्याचे ठरेल.या मंडळांनी घेतलेला निर्णय जरी स्वागतार्ह असला तरी मानाच्या पाच गणपतीनंतर कामयानी शाळा, महापालिकेचा गणपती, त्वष्टा कासार असाच क्रम गेली अनेक वर्षे चालत आला आहे. त्यामुळे ही मंडळे काय भूमिका घेतात हे महत्त्वाचे आहे. साधारणपणे पुण्यातील विसर्जन मिरवणूक ही २८ ते २९ तास चालते. मानाच्या पाच गणपतीनंतर ही मंडळे मिरवणुकीमध्ये सहभागी होणार आहेत. पण, यामुळे मिरवणूक खरंच लवकर संपेल का हा प्रश्न आहे. मात्र, पुण्याची मिरणवूक आजही देखाव्यानंतर गाजत असेल, तर तिच्या विक्रमी वेळेसाठीच. पुण्यात सार्वजनिक गणपतींमध्ये मानाच्या गणपतींना महत्त्वाचे स्थान आहे. कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग, केसरीवाडा यांचा यात समावेश होतो, तर मंडई, दगडुशेठ, जिलब्या मारुती यांचे महत्त्वही तितकेच आहे.

मानाच्या गणपतीमधील पथकांची संख्या तसेच त्यांच्यात पडणारे अंतर आणि वाढत जाणारा वेळ हा नेहमीच वादाचा आणि चर्चेचा मुद्दा राहिला आहे. त्यामुळे काही वर्षांपूर्वीच वेगळा पायंडा पाडत मानाच्या केसरीवाडा गणपतीने टिळक रस्त्याने मिरवणुकीत सामील होण्याचा निणर्य घेतला होता. मर्यादित पथके, पोलिसांच्या आक्रमक भूमिकेनंतर यात बऱ्यापैकी सुधारणा झाली आहे. यंदाही मिरणवूक लवकर संपविण्याचे आव्हान पोलिसांसमोर असणार आहे. पण, आता वेळेचा विचार करून हा निर्णय घेतला आहेच, तर कमी वेळात ही विसर्जन मिरवणूक पार पडते का, हे आता पाहावे लागेल.

अखिल मंडई आणि भाऊरंगारी गणपती मंडळाने मिरवणुकीत लवकर सहभागी होणार असे सांगितल्याने काही मंडळांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. सकाळी ७ वाजता आम्ही मिरवणूक सुरू करू असे मंडळांनी सांगितल्याने पेच निर्माण झाला आहे.

# कौशल्यवाद अंगीकारण्याचे आव्हान



आपल्याला उच्चशिक्षण पद्धतीत जागतिक प्रवाह आणायचे असतील, तर गुणांपेक्षा मूल्यांकनाला जास्त महत्त्व द्यायला हवे. शिक्षणाबाबतची पारंपरिक विचारपद्धती टाकून देऊन उच्चशिक्षण मुक्त करावे लागेल. बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीही लवचिक आणि बदलत्या गरजा सामावून घेणारी असायला हवी. जागतिकीकरणाचे फायदे घेण्यासाठी जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम हाती घ्यावे लागेल.

आज घडीला देश संक्रमणावस्थेतून जात आहे. सध्या विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत; ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे; परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशारितीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते आणि म्हणूनच या मंदीचा जास्त बाऊ करू नये. कारण या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी आणि देदीप्यमान यश मिळवण्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात केलेली माणसे ऊर्फ 'स्किल्ड मॅनपॉवर' आपल्याकडे उपलब्ध आहे. २०३५ पर्यंत आपण एका विकसित देशाचे नागरिक असू हे नक्की आणि त्यातून आपण एका वेगळ्या मार्गाने जगावर राज्यही करू शकू. माझ्या दृष्टीने आयटी या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट. आपल्या देशाची वाढती लोकसंख्या ही पहिल्यापासून एक मोठी समस्या मानली गेली आहे आणि त्यानुसार लोकसंख्या काबूत ठेवण्यासाठी विविध उपायही योजले गेले. इतक्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन जागतिक पातळीवर आर्थिक सत्ता मिळवण्यासाठी वापरता येईल हे फारसे कोणाला सुचले नाही.

माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, जैवतंत्रज्ञान, आरोग्य या पूर्णपणे कात टाकलेल्या किंवा नव्याने वर आलेल्या क्षेत्रांकडे नजर टाकल्यास हा फरक नक्कीच जाणवेल. याखेरीज प्रस्थापित उद्योगक्षेत्रांमध्येही धडाडीचे नवे उद्योजक येऊन अभूतपूर्व यश मिळवत आहे. मुख्य म्हणजे आजच्या या उद्योजकांना जागतिकीकरण, स्पर्धा इत्यादींची भीती वाटत नाही. उलट, पूर्वजांच्या सुरक्षित कोशांमधून आणि बंद किल्ल्यांमधून बाहेर पडून ते आज जगातल्या विविध कंपन्या धडाक्याने विकत घेत आहेत किंवा त्यांच्याशी आर्थिक-तांत्रिक सहकार्य करून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. आज येथील आयटी उद्योगाच्या विस्तारामुळे भारताला आशियातील सिलिकॉन व्हॅली मानले जाते ते उगीच नाही. यानंतर आपल्याकडे बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल सायन्स तसेच तंत्रज्ञानाच्या इतर बाबींमध्ये या नवीन ज्ञान आणि उद्योगशाखांचे विस्तारीकरण सुरू होईल. यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक क्षमता वाढेल आणि शिकलेल्या तरुण पिढीला रोजगाराची मोठी संधी निर्माण होईल. दर्जेदार व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रमाण वाढल्यास आणि सरकारी पातळीवरही पुरेसे प्रयत्न आणि वचनबद्धता दिसल्यास २०३० पर्यंत सर्व जर्मन मालाच्या उच्च दर्जासाठी जर्मन डिझाईन आणि तंत्रज्ञान जितके कारणीभूत आहे, तितकेच तेथील कामगाराचे कौशल्य, कसब महत्त्वाचे आहे. अमेरिकन शिक्षणपद्धती कष्टाळू, बुद्धिमान आणि कर्तबगार लोकांना वाव देणारी आहे. कौशल्यप्राप्त कामगार मिळत नसल्यामुळे भारतातील मोठमोठे उद्योग, आऊटसोर्सिंग करून आणि सब-कान्ट्रॅक्ट देऊन आपले काम करून घेतात. या पार्श्वभूमावर आता विद्यार्थी नोकरीला लागणारे सर्व ज्ञान आणि कौशल्य संपादन करूनच नोकरीत शिरला पाहिजे. उद्योगसमूहांनी आपले तज्ज्ञ, शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पाठवले पाहिजेत. त्यांनी आपल्या गरजा आणि आवश्यकता निर्देशित केल्या पाहिजेत. उच्च ज्ञान आणि कौशल्य अवगत करण्यासाठी त्या क्षमतेचे आणि ध्येयवादाचे शिक्षक नेमले पाहिजेत.

अमेरिकन विद्यापीठातील शिक्षकांचा ६० ते ८० टक्के वेळ संशोधनात, संशोधन निबंध प्रकाशित करण्यात, नवीन अभ्यासात, पुस्तके लिहिण्यात जातो. ते उरलेला वेळ वर्गात शिकवण्यासाठी वापरतात. संस्थांचे रँकिंग हे तेथे होणारे संशोधन आणि त्यांचा दर्जा अशा उपक्रमांवरून ठरवला जातो. आपल्याला उच्चशिक्षण पद्धतीत हे जागतिक प्रवाह आणायचे असतील, तर गुणांना कमी महत्त्व देऊन मूल्यांकनाला जास्त महत्त्व द्यायला हवे. शिक्षणाबाबतची, विशेषतः पारंपरिक विचारपद्धती टाकून देऊन उच्चशिक्षण मुक्त करावे लागेल. बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीही लवचिक आणि बदलत्या गरजा वेगाने सामावून घेणारी असायला हवी. जागतिकीकरणाचे फायदे हवे असतील, तर आपल्या मुला-मुलींना जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे लागेल. यासाठी प्रचंड प्रमाणावर शिक्षक लागतील हे खरे आहे; परंतु आपण ई-शिक्षण, आभासी शाळा (व्हर्च्युअल क्लासरूम) अशा बाबींचा वापर करू शकतो. माहिती तंत्रज्ञान-सक्षमित शिक्षणपद्धतीचा आपल्याला मोठा उपयोग होणार आहे. शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आतापर्यंत कोरलेले चित्र पुसण्याची आणखी एक पायरी आपल्याला ओलांडावी लागेल. शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झाल्यास शिक्षणाची किंवा शिक्षकाच्या दर्जाबाबतची फार मोठी चिंता तर मिटेलच, शिवाय शिक्षण देण्या-घेण्याच्या वेगामध्येही बदल होतील. येत्या काळात संगणकीकृत दूरशिक्षणाला मोठी मागणी येणार असून देशभरातल्या दूरदूरच्या हजारो विद्यार्थ्यांना वाजवी किमतीत उच्च शिक्षणाकडे वळणे शक्य येईल. शिकलेल्या लोकांचे आणि रोजगारांचे प्रमाण वाढले आणि त्यातून सर्वांना पैसा मिळू लागला की, भारतातल्या एकंदर सामाजिक वातावरणात फरक पडेल. एकंदरीत,

# व्यापार आणि बंदर विकासावर व्यूहात्मक भर



सर्वाधिक सागरी मार्ग असलेल्या देशांमध्ये भारताचा सोळावा क्रमांक लागतो. जागतिक आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर असलेल्या भारताचा आता बंदर विकास आणि त्या आनुषंगिक पायाभूत सुविधांवर भर आहे. व्यापार आणि संरक्षणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या बंदरांचा विकास करणे, नवीन बंदरांची उभारणी यावर आता सरकारने भर दिला आहे. त्यासाठी खासगी-सरकारी भागीदारी तसेच परकीय गुंतवणुकीला दारे खुली केली आहेत.भारतात १३ प्रमुख बंदरे आणि दोनशेहून अधिक अधिसूचित लघू आणि मध्यवर्ती बंदरे आहेत. भारत हे जगातील सोळावे सर्वात मोठे सागरी राष्ट्र आहे. पूर्व आशिया अमेरिका, युरोप, आफ्रिकासारख्या ठिकाणांदरम्यान प्रवास करणारी बहुतेक मालवाहू जहाजे भारतीय सागरातून जातात. भारतातील प्रमुख आणि लघू बंदरे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारापैकी सुमारे ९५ टक्के व्यापार हाताळतात. बंदरांच्या बांधकाम आणि देखभालीशी संबंधित प्रकल्पांसाठी सरकारने स्वयंचलित मार्गाखाली शंभर टक्क्यांपर्यंत परकीय थेट गुंतवणुकीला परवानगी दिली आहे. भारताची प्रमुख बंदरे दरवर्षी ८२० दशलक्ष मेट्रिक टन माल हाताळतात. त्यात २०१४ पासून ४७ टक्के वाढ झाली. त्याच कालावधीमध्ये एकूण बंदर क्षमता दुप्पट होऊन १,६३० दशलक्ष मेट्रिक टन झाली आहे. २०४७ पर्यंत भारताची बंदर क्षमता सहा पटींनी वाढवण्याची योजना आहे. जवाहरलाल नेहरू बंदराने दहा दशलक्ष टीईयू कंटेनर हाताळणी क्षमता प्राप्त केली आहे. जागतिक बँकेच्या 'लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्स' अहवाल २०२३ नुसार, भारत 'आंतरराष्ट्रीय शिपमेंट' श्रेणीत २२व्या क्रमांकावर आहे. २०१८ मध्ये तो ४४व्या स्थानावर होता. जागतिक बँकेच्या 'कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स

मोठ्या बंदरांमध्ये तंत्रज्ञानाशी संबंधित समस्या आणि अपुऱ्या पायाभूत सुविधा आहेत. तिथे पुरेसे बर्थ किंवा जहाजांसाठी पुरेशा लांबीचे प्लॅटफॉर्म्स उपलब्ध नाहीत. पूर्व किनाऱ्यावरील आणि मन्नारच्या आखाताजवळ जास्त गाळ साचण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांची क्षमता कमी होते. जागतिक दर्जाची मेगा बंदरे, ट्रान्सशिपमेंट हब आणि बंदर पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करून भारताच्या सागरी क्षेत्राच्या वाढीला गती देण्यावर सरकारने भर दिला आहे. भारताच्या ७,५०० किलोमीटर लांबीच्या किनारपट्टीचा वापर करून १४,५०० किलोमीटर संभाव्य जलमार्ग तयार करणे आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारमार्गांवर धोरणात्मक स्थान वापरून देशात बंदर नेतृत्व विकासाला चालना देणे ही सरकारची उद्दिष्टे आहेत. ऑपरेशन्स वाढवण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी स्वयंचलित क्रेन, रोबोटिक सिस्टीम आणि स्मार्ट पोर्ट मॅनेजमेंट सिस्टीमसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर विचारात घेतला पाहिजे. गतिमान आणि चांगले रस्ते आणि रेल्वे नेटवर्कद्वारे बंदरे आणि अंतर्गत प्रदेशांमधील कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. 'ब्लॉकचेन', 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' (आयओटी) आणि डेटा नाल समावेश असेल.

बंदराच्या पायाभूत सुविधांमध्ये प्रत्येकी एक हजार मीटर लांबीचे नऊ कंटेनर टर्मिनल, चार बहुउद्देशीय बर्थ, चार लिक्विड कार्गो बर्थ, एक रो-रो बर्थ, एक कोस्टल कार्गो बर्थ आणि एक कोस्ट गार्ड बर्थ यांचा समावेश आहे. या प्रकल्पामध्ये ऑफ शोअर क्षेत्रात १,४४८ हेक्टर क्षेत्र पुनर्संचयित करणे आणि १०.१४ किलोमीटर ब्रेकवॉटर, कंटेनर/कार्गो स्टोरेज क्षेत्रांचे बांधकाम समाविष्ट आहे. या प्रकल्पामुळे रोजगारासह स्थानिक मत्स्यव्यवसाय करणाऱ्या आणि या व्यवसायाशी संबंधित असलेल्या सर्व घटकांचे पुनर्वसन करून योग्य तो मोबदला देण्यात येणार आहे. हे बंदर समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे पाच किलोमीटर आत बांधले जाईल. त्यात पर्यावरणाची काळजी घेण्यात आली आहे. जगभरात कंटेनर शिप्सचा आकार वाढत आहे. त्यामुळे सुमारे १८ ते २० मीटर खोली असणाऱ्या एका बंदराची गरज भारताला आहे. जगातील सर्वात मोठे कंटेनर जहाज सामावून घेण्यासाठी भारताकडे एकही बंदर नाही. त्यामुळे नव्या बंदराची आवश्यकता आहे.

वाढवणच्या समुद्रकिनाऱ्यापासून १० किलोमीटरपर्यंत २० मीटरची नैसर्गिक पाण्याची खोली उपलब्ध आहे. यामुळे मोठमोठी जहाजे या बंदरात येऊ शकतील. इतर बंदरांप्रमाणे या ठिकाणी मेंटेनन्स ड्रेझिंग करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे वेळ आणि खर्चाची बचत होईल. या ठिकाणाहून मुंबई-दिल्ली पश्चिम रेल्वेमार्ग फक्त बारा किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे या बंदरात येणारा माल रेल्वेमार्गाने देशभर सहज पोहोचवता येईल. येथून मुंबई-दिल्ली राष्ट्रीय महामार्ग ३४ किलोमीटरवर आहे, तर मुंबई-वडोदरा एक्स्प्रेस वे १८ किलोमीटरवर आहे. मुंबईच्या उत्तरेला बांधले जात असल्यामुळे हे बंदर महाराष्ट्रासह गुजरात, मध्य प्रदेश आणि इतर राज्यांना जोडेल. वाढवण बंदरालगत विकासाच्या संधी लक्षात घेऊन वाढवण विकास केंद्राअंतर्गत चौथी मुंबई वसवण्यात येणार आहे. त्यासाठी वाढवण विकास केंद्राचे ३३.८८ चौरस किलोमीटर हे क्षेत्र वाढवून ५१२ चौरस किलोमीटर करण्याच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रस्तावाला राज्य सरकारने मान्यता दिली.

कोकणातील विकास केंद्रांची (ग्रोथ सेंटर) संख्या १३ वरून १९ करून विकास केंद्रांचे क्षेत्र ४४९.९३ चौरस किलोमीटरऐवजी २९८५ चौरस किलोमीटर करण्यासंबंधीची अधिसूचना राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने प्रसिद्ध केली. या अधिसूचनेनुसार वाढवण विकास केंद्रातील गावांची संख्या ११ वरून ९६ करण्यात आली आहे. या आनुषंगाने वाढवण विकास केंद्रातील क्षेत्र ३३.८८ किलोमीटरवरून थेट ५१२ चौरस किलोमीटर केले. त्यामुळे आता डहाणूतील ९३ आणि तलासरीतील ३ अशा एकूण ९६ गावांचा विकास चौथी मुंबई म्हणून केला जाणार आहे. या ९६ गावांच्या विकासासाठी 'एमएसआरडीसी'ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्तीही करण्यात आली आहे.

क्षेत्र, गावे वाढल्याने आता वाढवण विकास केंद्राअंतर्गत वाढवण बंदरालगत आंतरराष्ट्रीय दर्जाचे नवीन शहर अर्थात 'पोर्ट सिटी' वसवण्यात येणार आहे. आता वाढवण विकास केंद्राची विकास योजना तयार करण्याच्या, चौथ्या मुंबईचा आराखडा तयार करण्याच्या कामाला 'एमएसआरडीसी'कडून सुरुवात होणार आहे. वाढवण बंदर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बंदर म्हणून प्रस्तावित असल्याने त्याला आनुषंगिक वाहतूक, उद्योग, कंटेनर डेपो, उद्योगाचे नियोजन इत्यादींचाही विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार 'एमएसआरडीसी'कडून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्व सोयी-सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन, विमानतळ आदी सुविधांनी युक्त चौथी मुंबई या बंदरालगत आकाराला येणार आहे.

# शहादा तालुक्यात महसूल विभागाचा 'गृहभेटी' उपक्रम यशस्वी; सामाजिक योजनांचे लाभ थेट लाभार्थ्यांच्या दारी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

महसूल सप्ताह २०२५ अंतर्गत, नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यात एक अभिनव आणि लोकाभिमुख उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात आला. सहाय्यक जिल्हाधिकारी कृष्णकांत कनवरिया यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने 'गृहभेटी' उपक्रमांतर्गत सामाजिक सहाय्य योजनांच्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना थेट मदत केली. या उपक्रमामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि लोकाभिमुखतेवर जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

**'डीबीटी' प्रक्रियेला गती देत घरपोच सेवा.**
या उपक्रमाचा मुख्य उद्देश, विशेष सहाय्य योजनांतर्गत ज्या लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रक्रियेमुळे अनुदान मिळाले नाही, अशांपर्यंत पोहोचणे हा होता. शहादा तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांनी संजय गांधी निराधार योजना शाखेकडून तयार केलेल्या गावनिहाय व मंडळनिहाय याद्यांच्या आधारे, लाभार्थ्यांच्या घरी जाऊन अनुदानाचे वाटप केले. यामुळे प्रशासकीय प्रक्रियेला गती मिळाली आणि लाभार्थ्यांना घरात बसूनच सरकारी योजनांचा फायदा मिळाला.

**पर्यावरण आणि संवाद यांचा संगम–:**याच उपक्रमाचा एक भाग म्हणून, म्हसावद येथील साईबाबा हायस्कूलमध्ये 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. यासोबतच पालक आणि विद्यार्थ्यांसाठी एका विशेष संवाद कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहाय्यक जिल्हाधिकारी कनवरिया यांनी स्वतःच्या आय. ये. येस. बनण्यापर्यंतच्या प्रवासातील प्रेरणादायी अनुभव विद्यार्थ्यांसोबत शेअर केले. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात ध्येय निश्चित करण्याचे महत्त्व सांगितले. तसेच, तहसीलदार दिपक गिरासे यांनीही आपल्या प्रशासकीय अनुभवातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



**महसूल विभागाची मानवीकरणाकडे वाटचाल:–**हा उपक्रम केवळ प्रशासकीय कार्यपद्धतीचा भाग नसून, महसूल विभागाच्या मानवीकरणाची एक उत्कृष्ट मिसाल ठरला आहे.

**घरपोच प्रशासन:–** महसूल विभागाचे कर्मचारी थेट लाभार्थ्यांच्या घरी पोहोचले, ज्यामुळे प्रशासनाचे कार्य अधिक सुलभ आणि लोकाभिमुख झाले.

**जनतेशी संवाद:–** पालक आणि विद्यार्थ्यांशी झालेल्या संवादातून शासनाची लोकांशी जोडणी अधिक मजबूत झाली.

**सामाजिक मूल्यांचा जागर:–** 'एक पेड माँ के नाम' सारख्या उपक्रमांद्वारे पर्यावरण संरक्षणासारख्या सामाजिक मूल्यांना प्रोत्साहन मिळाले.

**जनतेचा सकारात्मक प्रतिसाद:–** गावातील नागरिकांनी आणि लाभार्थ्यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. 'ग्राम महसूल अधिकारी आमच्या घरी आले, ही बाब आमच्यासाठी अभिमानाची आहे,' अशा प्रतिक्रिया लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या. सहाय्यक जिल्हाधिकारी श्री. कृष्णकांत कनवरिया यांच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या या गृहभेटी उपक्रमाने सामाजिक योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि वेग आणला आहे. त्यामुळे, ग्रामपातळीवरील जनतेचा महसूल विभागावरचा विश्वास वाढला आहे आणि प्रशासकीय कार्यपद्धतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमामुळे प्रशासन आणि जनता यांच्यातील दरी कमी होऊन एक सलोख्याचे आणि सहकार्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

# तंत्रज्ञानाच्या मदतीने महसूल विभाग होणार अधिक सक्षम

## मुख्यमंत्री फडणवीसांनी महसूल परिषदेत व्यक्त केला विश्वास

**नागपूर (वृत्तसंस्था)–** महसूल विभाग हा राज्याच्या आर्थिक विकासाचा कणा असून गतिमानता, पारदर्शकता आणि तत्परतेने सेवा देण्याची त्याची ओळख आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमधील भारतीय प्रबंध संस्थान (आयआयएम) येथे आयोजित महसूल परिषदेच्या समारोपीय कार्यक्रमात बोलताना हे विचार व्यक्त केले.मुख्यमंत्र्यांनी सांगितले की राज्यातील जनतेला सर्वाधिक ऑनलाइन सेवा उपलब्ध करून देणारा हा विभाग आहे. अधिक लोकाभिमुखतेसाठी महसूल परिषदेत अभ्यास गटांनी सादर केलेल्या शिफारशी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दिशादर्शक ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे आणि मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी यांची उपस्थिती होती.परिषदेदरम्यान आयआयएममधील वेगवेगळ्या कक्षात मुख्यमंत्री, महसूल मंत्री, मुख्य सचिव व अपर मुख्य सचिवांनी सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्यासमवेत बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये त्यांनी आवश्यक माहिती जाणून घेतली. परिषदेत विभागीय आयुक्त प्रमुख असलेल्या समित्यांकडून विविध अहवाल सादर करण्यात आले. महसुली कामकाजात सुसूत्रता व गतिमानता आणण्यासाठी आवश्यक बाबी मुख्यमंत्र्यांच्या



निदर्शनास आणून देण्यात आल्या.महसुली सेवा व योजनांच्या लाभांपासून कोणताही नागरिक वंचित राहू नये यासाठी अधिकाधिक सेवा ऑनलाईन पद्धतीने देण्याबरोबरच त्यात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सादरीकरणाच्या माध्यमातून महत्वपूर्ण बाबी समितीकडून मांडण्यात आल्या.मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना शासनास सादर करण्यात येणारा अहवाल अचूक व निर्दोष असावा यासाठी प्रत्येक बाबींचा सखोल अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या.

# एसटी महामंडळ राज्य शासनाचे अधिकृत यात्री ॲप चालवणार–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

चालकाला सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारे राज्य शासनाचे अधिकृत यात्री प लवकरच एसटी महामंडळ मार्फत सुरू करण्यात येत आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते मंत्रालयातील आपल्या दालनामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या ग्रीगेटेड पॉलिसीच्या (समुच्चयक धोरण) आधीन राहून राज्य शासनाचे यात्री प बनवण्याच्या अंतिम मसुद्यावरील चर्चेवेळी बोलत होते. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व इतर अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, राज्य सरकारने मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, भरमसाठ नफा कमवून प्रवासी व चालकांना वेठीस धरणाऱ्या खाजगी कंपन्यांच्या जोखंडातून मुक्त करण्याच्या प्रमाणित हेतूने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रवासी ॲप बस, रिक्षा , टॅक्सी व ई-बस या वाहन सेवा करीता सुरू करण्याचे निश्चित केले आहे. सदर प राज्य शासनाच्या परिवहन विभागाच्या सहकार्याने एसटी महामंडळा मार्फत सुरू करण्यात येईल. भविष्यात एस टी महामंडळाला उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करणे व प्रवाशांना एक विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे हा उद्देश समोर ठेवून हे शासकीय प एसटी महामंडळाने चालवणे योग्य राहील असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.



या प ला जय महाराष्ट्र, महा - राईड, महा–यात्री, महा–गो छावा राईड यापैकी एखादे नाव देण्या बाबत चर्चा झाली. नवीन शासकीय प ला छावा राईड प हे नाव द्यावे असे सर्वानुमते ठरले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या अंतिम मान्यतेने हे प लवकरच कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न केले जातील अे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.एसटी महामंडळातर्फे चालवण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या अधिकृत प द्वारे रोजगाराची संधी मिळणाऱ्या मराठी तरुण– तरुणींना मुंबै बँकेच्या माध्यमातून विशेष आर्थिक पाठबळ देण्यात येईल असे आश्वासन बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी दिले. या तरुण–तरुणींना रोजगार देण्यासाठी मुंबई बँकेच्या माध्यमातून वाहन खरेदीसाठी १० टक्के व्याजदराने कर्ज दिले जाईल. तसेच अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ, भटके विमुक्त महामंडळ, ओबीसी महामंडळ आणि एमएसडीसी या संस्थांतर्फे ११ टक्के व्याज परतावा अनुदानाच्या स्वरूपात देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जाणार असून, त्यामुळे हे कर्ज बिनव्याजी असल्यासारखे आहे. असे प्रतिपादन आमदार प्रवीण दरेकर यांनी केले. मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, केंद्र सरकारच्या ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्वानुसार या प ची नियमावली अंतिम टप्यात आहे. सध्या खाजगी संस्था अनाधिकृत प च्या माध्यमातून प्रचंड नफा कमवतात. त्यासाठी त्या कंपन्या चालक व प्रवासी यांची लूट करीत आहेत. एसटी महामंडळडे कडे यंत्रणा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ व जागा मुबलक प्रमाणात असल्यामुळे शासनाने असे प विकसित करून चालविण्यासाठी एसटी महामंडळाला दिल्यास त्याचा फायदा प्रवाशां बरोबर एसटी महामंडळाला देखील होईल. राज्य शासनाचे अधिकृत यात्री प चालविण्यासाठी एसटी महामंडळाची प्रवाशा प्रती असलेली निष्ठा, आणि वर्षानुवर्षापासूनची विश्वासार्हता उपयोगी पडणार असुन उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण होणार आहे.

# बृहन्मुंबई महानगरपालिका, अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाऊंडेशन यांच्यातील 'प्रोजेक्ट उत्थान'च्या परवाना प्रमाणपत्राचे हस्तांतरण

**मुंबई । प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग अंतर्गत कार्यरत शाळांमधील विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र (एफएलएन) बळकट करण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिका, अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाऊंडेशन यांच्यात 'प्रोजेक्ट उत्थान' हा प्रकल्प राबविला जात आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अदाणी समूह यांच्यात या प्रकल्पासंदर्भातील परवाना प्रमाणपत्र मंगळवारी ०४ ऑगस्ट रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात हस्तांतरित करण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उपायुक्त (शिक्षण) श्रीमती प्राची जांभेकर, अदाणी समुहाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. कंदर्प पटेल, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रमेश शर्मा, श्री. शनय शहा, श्री. कैलास शिंदे, श्री. जतीन उपाध्ये, श्री. सुबोध सिंग आदी यावेळी उपस्थित होते.बृहन्मुंबई महानगरपालिका, अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाऊंडेशन यांच्यात शिक्षणकेंद्रीत सार्वजनिक–खाजगी भागीदारी अंतर्गत



२०२१ पासून 'प्रोजेक्ट उत्थान' हा प्रकल्प राबविला जात आहे. केंद्र शासनाच्या 'निपूण भारत मिशन'शी सुसंगत असलेला हा प्रकल्प राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) च्या मुलभूत तत्वांना मूर्त रुप प्रदान करतो.बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने जानेवारी–एप्रिल २०२५ मध्ये इयत्ता दुसरीच्या सर्व ३१००० विद्यार्थ्यांना घेऊन प्रायोगिक तत्वावर एक प्रकल्प राबविण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणात लक्षणीय प्रगती दिसून आली आहे.याच पार्श्वभूमीवर, या प्रकल्पाचा २०२५–२६ ते २०२७–२८ या तीन शैक्षणिक सत्रांसाठी आणि इयत्ता पहिली ते चौथीच्या मधील सर्व विद्यार्थ्यांसाठी आता विस्तार करण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९४७ शाळांमधील इयत्ता पहिली ते चौथीच्या सुमारे दीड लाखांहून विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल. देशात इतक्या व्यापक प्रमाणावर कार्यरत असलेल्या प्रकल्पांपैकी हा एक प्रकल्प आहे.या अंतर्गत, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्वाचा घटक असलेल्या पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र (फाऊंडेशनल लिटरसी अँड न्यूमरसी, एफएलएन) बळकट करण्यावर भर दिला जाईल. त्यासाठी शाळांमध्ये एकूण ३१६ प्रशिक्षित उत्थान सहायक महिलांची नेमणूक करण्यात येईल. शाळेत नियमित न येणारे, शिक्षणात अधिक रस नसणारे किंवा बौद्धिक स्तर कमी असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या सर्व उत्थान सहायक संबंधित शाळेतील शिक्षकांना सहाय्य करतील. विद्यार्थ्यांचे दैनंदिन मूल्यमापन, प्रत्येक विद्यार्थीकेंद्रीत अध्ययन आदी बाबीही यात अंतर्भूत असतील. तसेच, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची गुणात्मक प्रगती साधण्यासाठी त्यांना सराव साहित्य पुरविण्यात येईल. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या संपूर्ण आर्थिक खर्चाची जबाबदारी अदाणी इलेक्ट्रीसिटी आणि अदाणी फाऊंडेशनने घेतली आहे. तर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील.

# एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या प्रवक्त्या म्हणून शायना एनसी यांची नियुक्ती

**मुंबई (वृत्तसंस्था)–**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्या शायना एनसी यांची पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे प्रमुख असलेले एकनाथ शिंदे यांनी ही नियुक्ती केली आहे. फॅशन डिझायनरपासून राजकारणी बनलेल्या शायना यांचा हा कार्यकाळ एक वर्षाचा असेल.



यापूर्वी भाजपमध्ये असलेल्या शायना एनसी यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या काही दिवस आधी शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महानगरातील मुंबादेवी मतदारसंघातून निवडणूक लढवली पण त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर त्या परत भाजपमध्ये जातील, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, आता त्यांच्यावर शिवसेनेने ही महत्त्वाची जबाबदारी दिली आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर अनेक महत्त्वाच्या नियुक्त्या आणि पक्षांतर होत आहेत. त्यातच शायना एन.सी. यांची आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ४ ऑगस्ट २०२५ पासून एक वर्षासाठी प्रभावी असेल. यामुळे शिंदे गटाने आपल्या पक्षातील संवाद कौशल्य अधिक प्रभावी करण्याचा स्पष्ट संकेत दिला आहे. शायना एन.सी. या माध्यमांमध्ये चांगल्या प्रकारे आपला प्रभाव दाखवू शकतात, हे भाजपमधील त्यांच्या कार्यकाळात दिसून आले आहे.

## कोल्हापूरच्या 'माधुरी'साठी मंत्रालयात बैठक

# हत्ती परत आणण्यासाठी प्रयत्न करणार–मुख्यमंत्री फडणवीस

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)–**कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठाची 'महादेवी' हत्तीण पुनर्वसनाच्या नावाखाली दुसऱ्या राज्यात नेल्याने सुरू असलेल्या वादामुळे राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक झाली. यामध्ये काँग्रेसचे विधान परिषद सदस्य सतेज पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी भाग घेऊन आक्रमक भूमिका मांडली, ज्यामुळे सरकारची कोंडी झाली आहे.माध्यमांशी बोलताना राजू शेट्टी यांनी अत्यंत संतप्त प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलण्यासाठी आलो. तो कायदा काय सांगतो, कोर्ट काय म्हणतंय याच्याशी आम्हाला काही देणं-घेणं नाही. आमचे हत्ती मारण्यासाठी वनतारामध्ये घेऊन जात आहात का? असा थेट सवाल त्यांनी सरकारला विचारला.



शेट्टी यांनी प्रशासनावर कोर्टाची दिशाभूल केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, पशुसंवर्धन विभागाच्या ९ वेगवेगळ्या टेस्टमध्ये माधुरी हत्तीण पास झाली असताना, तिला 'अनफिट' ठरवून 'वनतारा'चा रिपोर्ट सांगतो की तिला 'मल्टिपल फ्रॅक्चर' आहे, 'संधिवात' आहे. मग महाराष्ट्राचे अधिकारी खोटे आहेत, की 'हत्ती पाहिजे' म्हणून हत्ती घेऊन जाणारे खोटे आहेत, हे स्पष्ट झाले पाहिजे. त्यांनी 'वनतारामधील' इतर हत्तींचे व्हिडिओ का येत नाहीत, असा प्रश्नही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे. आता आम्हाला कायद्याचा कुट काढण्यामध्ये अजिबात रस नाही. आम्हाला आमचा हत्ती परत पाहिजे. यावर शासन काय करणार या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनभावना आम्ही महाराष्ट्र शासनाच्या वतीने मांडू. हत्तिणीला परत आणण्यासाठी प्रयत्न करणार असे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे राजू शेट्टी म्हणाले.

# महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचा पत्रकारांच्या वतीने आज स्वागत समारंभ

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या विकास कामांमध्ये महत्वपुर्ण योगदान देत असल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचा आज गुरुवार दिनांक दि.७ ऑगस्ट २०२५ रोजी बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांनी बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी स्विकारल्या पासून अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. २ एप्रिल २०२५ रोजी अजित दादांनी बीडमध्ये Center for Invention, Innovation, Incubation and Training (CIIIT)' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वीच टाटा टेक्नॉलॉजीने १९१ कोटींच्या गुंतवणुकीतून दोन आठवड्यातच हा प्रकल्प सुरू करण्याची संकल्पना मांडली असून, त्यात दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना प्रशिक्षित करण्याची क्षमता ठेवण्यात आली आहे. बीड एमआयडीसी औद्योगिक परिसरातील ४,००० चौरस मीटर जागेची व्यवस्था आणि प्रकल्प उभारणीसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यामध्ये पूर्वी मोठ्या प्रमाणात देण्यात आलेल्या ३४० शस्त्र परवान्यांची फेर तपासणी करुन ते रद्द करण्याचे आदेश अजित दादांनी दिले. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसला. बीड जिल्ह्याचे पोलीस दल सक्षम व्हावे यासाठी १६ कोटी रुपये विशेष निधी मंजूर करण्यात आला. परळी येथे पशुवैद्यकिय महाविद्यालयाला ५०० कोटी रु.ची तरतुद अजित दादांनी केली.दिनांक १७ मार्च २०२५ रोजी अजित दादा पवार यांनी विधानसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात बीडमध्ये सुसज्ज विमानतळ उभारण्याची घोषणा केली. या विमानतळासाठी लागणार्या जमिनीचे अधिग्रहण करण्याचे आदेश दिले. बीड जिल्हा प्रशासन या कामामध्ये अत्यंत गतीने काम करताना दिसत आहे. या शिवाय इतरही अनेक निर्णय ना.पवार यांनी घेतले असून बीड जिल्हा प्रशासनाची प्रतिमा स्वच्छ आणि पारदर्शक करण्यामध्ये त्यांचा मोठा सहभाग आहे. एकूणच या सर्व कामाची दखल घेवून ना.पवार यांचे ऋणनिर्देश व्हावेत यासाठी पत्रकार संघाने पुढाकार घेतला आहे. आज गुरुवार दि.७ ऑगस्ट रोजी बीड शहरातील नगर रोड वरील तहसील ऑफिसच्या समोर असलेल्या हॉटेल निलकमलच्या सभागृहात सायंकाळी ४ वाजता ना. अजित दादा पवार यांचा स्वागत समारंभ संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष संतोष मानूरकर, तसेच वैभव स्वामी, बालाजी तोंडे, शेख रिजवान,प्रतिक कांबळे, अमजद पठाण,दिपक काळकुटे, अॅड.विनायक जाधव,शेख आएशा, शेख ताहेर आदिंनी केले आहे.



# विस्तार अधिकारी विजयकुमार मस्के आणि कनिष्ठ सहाय्यक उषा चाटे-गित्ते यांचा सत्कार



केज । गौतम बचुटे

केज पंचायत समितीचे विस्तार अधिकारी विजयकुमार मस्के आणि कनिष्ठ सहाय्यक उषा चाटे-गित्ते यांचा सत्कार करण्यात आला.या बाबतची माहिती अशी की, गेवराई पंचायत समिती येथून पदोन्नती झालेले विजयकुमार मस्के हे केज पंचायत समितीच्या पंचायत विभागाच्या विस्तार अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. तर चिंचोली माळी येथे पूर्वी परिचर म्हणून सेवारत असलेल्या उषा चाटे-गित्ते यांना कनिष्ठ सहाय्यक पदी पदोन्नती झालेली असल्याने. त्या सुद्धा केज पंचायत समितीला कनिष्ठ सहाय्यक पदावर रुजू झालेल्या आहेत.

त्या बद्दल पंचायत समिती, ग्रामपंचायत अधिकारी, मित्र आणि गावकऱ्यांच्या वतीने दोघांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी ढोकर, विस्तार अधिकारी अनिल चवरे, ग्रामपंचात अधिकारी संघटनेचे तालुका अध्यक्ष धनराज सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्था बीडचे मधुकर चोपडे, ग्रामपंचायत अधिकारी राजाभाऊ वरपे, वरिष्ठ सहाय्यक शेख, वरिष्ठ सहाय्यक मामुसदार, माजी उपसरपंच श्रीमंत गित्ते, कांबळे, धनराज सोनवणे, गौतम बचुटे, दिलीप कसबे हे उपस्थित होते.

# संत रामपालजी महाराजांच्या सत्संग कार्यक्रमाला अनुयायांची मोठी गर्दी

## अक्कलकुवा तालुक्यातील भगदरी येथे झाला कार्यक्रम

मोलगी । रवींद्र वळवी

अक्कलकुवा तालुक्यातील भगदरी येथील निसर्गरम्य राजीव गांधी भवनात संत रामपालजी महाराजांच्या सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने अनुयायी उपस्थित होते. सत्संगात प्रोजेक्टरच्या माध्यमातून संत रामपालजी महाराजांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



यावेळी त्यांनी सृष्टी रचनेचे सविस्तर वर्णन केले. संत रामपालजी म्हणाले की, जेव्हा परमात्मा जिंदा महात्म्याच्या रूपात धर्मदासजी यांना भेटले, तेव्हा त्यांनी त्यांना संपूर्ण सृष्टी रचना समजावून सांगितली. 'धर्मदास ये जग बौराणा, कोई ना जाने पद निर्वाना। यही कारण ये कथा पसारा, जग से कहियो राम निराला' या दोह्याचा अर्थ सांगताना ते म्हणाले की, हे जग वेडे झाले आहे, मुक्तीचा खरा मार्ग कोणालाही माहीत नाही. म्हणूनच मी जगाला अशा रामाचे महत्त्व सांगत आहे, जो जगातील सर्व गोष्टींपेक्षा वेगळा आणि श्रेष्ठ आहे. त्रिगुणांच्या मायेमुळे लोक या रामाला विसरले आहेत.

संत रामपालजींनी सृष्टी रचनेची माहिती देताना सांगितले की, काळ ब्रह्म आणि प्रकृती देवी (दुर्गामाता) यांच्या त्रिगुणमयी मायेचे तीन पुत्र,ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या भक्तीमध्ये लोक गुरफटले आहेत. त्यामुळे ते या तीनही देवांच्या पित्याला विसरले आहेत. तर मूळ रामापर्यंत कसे पोहचतील यावेळी ते म्हणाले 'गुण तीन की भक्ति में ये भूल बडा संसार, कहे कबीर निज नाम बिना कैसे उतरे पार' या कबीर दोह्याचा अर्थ सांगताना ते म्हणाले की, तीन गुणांच्या भक्तीमुळे लोक मूळ उद्देश विसरले आहेत आणि निज नाम (ईश्वराचे खरे नाव) घेतल्याशिवाय भवसागर पार करणे शक्य नाही.

यावेळी त्यांनी सर्वांना खऱ्या परमात्म्याची ओळख करून घेण्याचे आणि त्याच्या भक्तीत लीन होण्याचे आवाहन केले. या सत्संगामुळे मोक्षप्राप्ती आणि सतलोक मिळेल, असा संदेशही त्यांनी दिला. कार्यक्रमासाठी वाहनतळ सेवा, चप्पल,बूट सेवा, जलराम सेवा, चायराम सेवा यांसारख्या सेवा अनुयायांनी शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडल्या. बाहेरून आलेल्या लोकांनीही या कार्यक्रमाचे आणि शिस्तीचे कौतुक केले.एकंदरीत या कार्यक्रमाला जिल्ह्यातील बाहेरगावाहून आलेल्या लोकांना पावसाला सुरू असल्याने हिरवाई ने नटलेल्या सातपुड्यातील निसर्गाचे विलोभनीय दृश्याचा देखील अनुभव घेता आला

# मायबाप सरकारने युवा प्रशिक्षणार्थींना कायम स्वरूपी हक्काची भाकरी द्यावी-दत्तात्रय मुजमुले

## सांगली येथील बेमुदत आमरणउपोषण म्हणजे उद्रेकाची सुरूवातच

केज । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील महायुती सरकारने राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी निवडणुकीच्या तोंडावर सहा महिन्यांसाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी म्हणून योजना काढली.त्यात अनेक तरुणांना अल्प रोजगार मिळाला.मात्र सरकारने त्यापुढे फक्त पाच महिन्याचा कालावधी वाढवत सुशिक्षित बेरोजगार तरुण तरुणींचे भविष्य अंधारात ढकलले आहे.

सरकारने राज्यातील अंदाजे १ लाख ३४ हजार मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थीनावाऱ्यावर सोडत आहेत.बेरोजगार तरुणांच्या हाताला काम नाही,त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.पुढे पाच महिने वाढीव देण्यात आले असून भविष्यात मात्र कालावधी



वाढवणार नसल्याचे मुख्यमंत्री यांनी सांगितले आहे.राज्या तील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व त्या खात्याचे मंत्री हे युवा प्रशिक्षणार्थींच्या भावनेशी खेळत आहेत.प्रशिक्षणार्थींना हे सरकार फसवत आहेत.युवाप्रशिक्षणार्थीयांना हक्काची कायम स्वरूपी भाकरी मिळवून देण्यासाठी सांगली जिल्ह्यातील कृष्णामाईच्या घाटावर महाराष्ट्र राज्य युवा प्रशिक्षणार्थी कृती समितीचे तुकाराम बाबा महाराज हे पाच दिवस आमरण उपोषणाला बसले होते.ही युवा प्रशिक्षणार्थींच्या उद्रेकाची सुरूवात आहे.तरी सरकारने राज्यातील युवा प्रशिक्षणार्थी यांच्या मागण्या गांभीर्याने घेऊन राज्यातील युवा प्रशिक्षणार्थींना कायम स्वरूपी हक्काची भाकरी द्यावी अशी मागणी युवा प्रशिक्षणार्थी तथा पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केली आहे.

# विश्व आदिवासी गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर बोरद दूरक्षेत्रात शांतता समितीची बैठक

नंदुरबार । दिपक गोसावी

विश्व आदिवासी गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर दिनांक ५ ऑगस्ट रोजी बोरद दूरक्षेत्रामध्ये तळोदा पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक राजू लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक घेण्यात आली. ८ ऑगस्ट रोजी बोरद येथे आणि १० ऑगस्ट रोजी मोड येथे साजरा होणाऱ्या या दिनानिमित्त शांतता राखण्यासाठी तसेच आयोजनासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली.

यावेळी राजू लोखंडे यांनी आयोजकांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. डीजेवर पूर्णपणे बंदी असून, नियम मोडल्यास कठोर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. त्याऐवजी आपली संस्कृती जपण्यासाठी ढोल ताशांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. शांतता राखण्याची जबाबदारी आयोजकांवर राहील



आणि मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास आयोजक जबाबदार असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. मिरवणूक शांततेत दोन तासांत संपवावी आणि मिरवणुकीत कोणीही मद्यपान करू नये, कारण यात महिलांचा मोठा सहभाग असतो, असेही ते म्हणाले.

या बैठकीत कॉम्रेड दयानंद चव्हाण आणि गुलाबसिंग गिरासे यांनी बोरद परिसरात वाढलेल्या चोऱ्यांच्या घटनांवर चिंता व्यक्त केली. त्यांनी दूरक्षेत्रात कायमस्वरूपी दोन पोलीस कर्मचारी नेमण्याची मागणी केली.यावर राजू लोखंडे यांनी रोज तीन पोलीस कर्मचारी उपस्थित राहतील, असे आश्वासन दिले.

या बैठकीला विश्व आदिवासी गौरव दिनाचे आयोजक कुणाल पाडवी यांच्यासह दयानंद चव्हाण, सुकलाल ठाकरे, गुलाबसिंग गिरासे, मंगेश पाटील, संजीव पेंटर, देवेंद्र ठाकरे, मगन ठाकरे, विजय मावची, अंबालाल वळवी, राणाजी भिलाव, रणजीत वळवी, रतन वळवी यांच्यासह अनेक आदिवासी बांधव उपस्थित होते. बैठकीसाठी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश अहिरे,पोलीस हेडकॉन्स्टेबल भिमसिंग ठाकरे, पोलीस कॉन्स्टेबल राजीव जगताप, तुकाराम पावरा, यांनी सहकार्य केले.

# आ.राजेश पाडवी यांच्या पुढाकाराने तळोदा येथील बेवारस मुलांना मिळाला आधार

## वृद्धांनाही वृद्धाश्रमात पाठवण्याचे निर्देश



नंदुरबार । दिपक गोसावी

दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी शहादा तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी यांनी तळोदा शहरातील कचरा डेपो येथे बेवारस अवस्थेत वावरणाऱ्या लहान मुले आणि वृद्धांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. आमदार पाडवी यांच्या या संवेदनशील भूमिकेमुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तळोदा येथील व्यावसायीक महेश चौधरी व त्यांच्या पत्नी विद्या चौधरी यांनी कचरा डेपो येथील बेवारस मुलांची माहिती आमदार राजेश पाडवी यांना दिली. माहिती मिळताच आमदार पाडवी यांनी तात्काळ दखल घेत आपले स्वीय सहायक किरण सूर्यवंशी यांना घटनास्थळी पाठवले. चौकशीअंती मुले बेवारस असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर, आमदार पाडवी यांनी मुलांना बाल सुधारगृहात पाठवण्याचे निर्देश दिले.या मदतकार्यात आमदार पाडवी यांच्या पत्नी प्रिया राजेश पाडवी यांच्या अध्यक्षतेखालील कलावती फाउंडेशननेही सहभाग घेतला. प्रिया पाडवी आणि त्यांच्या कन्या नेहा पाडवी यांनी मुलांची आरोग्य तपासणी डॉक्टरांकडून करून घेतली. 'भारती' नावाच्या एका मुलीला स्वच्छ करून, तिला नवीन कपडे देऊन आणि आरोग्य तपासणी करून बाल सुधारगृहात पाठवण्यात आले.

आमदार पाडवी यांनी कचरा डेपो येथे उदरनिर्वाह करणाऱ्या वृद्ध नागरिक आणि महिलांना वृद्धाश्रमात पाठवण्याचे निर्देशही दिले आहेत. आमदार पाडवी यांचे स्वीय सहाय्यक किरण सूर्यवंशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, यावर लवकरच कार्यवाही केली जाईल.या मदतकार्यात भाजपचे कार्यकर्ते जगदीश परदेशी, विनोद माळी आणि चेतन शर्मा यांच्यासह अनेकांनी सहभाग घेतला. आमदार राजेश पाडवी यांच्या या कार्यामुळे तळोदा शहरात समाधानाचे वातावरण आहे.

# वर्षानुवर्षे सावऱ्यादिगरच्या वनपट्ट्यांचा विषय प्रलंबित



मोलगी । रविंद्र वळवी

आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी वनाधिकार कायद्यानुसार सावऱ्यादिगर (ता.धडगाव) येथील ३३८ शेतकऱ्यांनी वनपट्टे मागणीसाठी प्रकरणे सादर केली. परंतु, शासनामार्फत केवळ आठच प्रस्ताव मंजूर करण्यात आले, उर्वरित ३३० प्रकरणे काही वर्षांपासून आजही प्रलंबित आहे. या प्रलंबित प्रकरणांची सहनिशा करत माजी जि.प.सदस्य रतन पाडवी यांनी याबाबत पाठपुरावा केला जाणार असल्याचे सांगितले. वन अधिकार कायद्यात मूळनिवासी तथा पिढ्यान् पिढ्या वनक्षेत्रातील जमीन कसत उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासींना ते क्षेत्र वनदाव्यांतर्गत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार सावऱ्यादिगर येथील ३३८ शेतकऱ्यांनी वनदावे दाखल केले. या प्रकरणांना काही वर्षे उलटली, तरीही या शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागला नसल्याचे छगन पावरा, राड्या पावरा, मुकेश पावरा यांच्यासह अन्य शेतकऱ्यांनी सांगितले. याबाबत पाठपुरावा करण्यासाठी शेतकऱ्यांनी जि.प.सदस्य रतन पाडवी यांची भेट घेतली. पाडवी यांनी या प्रकरणांची चौकशी करत शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल असे सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077